मुंबई, दिनांक २५ मे, २०१६

# (सुधारित वृत्त)

## कथित दाऊद फोन संभाषण प्रकरणाची पाळेमुळे खणून काढणार
## पाकिस्तानातून प्राप्त माहिती पोलिसांकडे सुपूर्द

**- मंत्री एकनाथराव खडसे**

मुंबई, दि. २५ मे : मेहेजबीन शेख यांच्या नांवावर असलेल्या फोनवरुन माझ्या मोबाईल फोनवर आलेल्या कथीत फोनकॉल्स बाबत माझ्यावर जो आरोप केला आहे, त्या प्रकरणाशी संबंधित अधिकृत माहिती पाकिस्तानातून प्राप्त झाली आहे. मेहजबीन शेख या नावाची व्यक्ती कोण आहे, ज्या पत्त्यावर ही व्यक्ती राहते असा दावा हॅकर करीत आहे, तो खरा आहे का, त्या पत्त्यावर कोण राहत आहे या संबंधीची माहिती मिळाली असून सदर माहिती मुंबई पोलीसांकडे तपास करण्यासाठी सोपविली आहे. या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढण्यात येणार आहेत. या प्रकरणी लवकरात लवकर तपास करुन तथ्य जनतेसमोर आणावे, अशी आपण पोलिसांना विनंती केली आहे. असे महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज मंत्रालयात वार्ताहरांशी बोलतांना सांगितले.

या साऱ्या प्रकरणावर पोलीस महासंचालक लक्ष ठेवून असल्याचे सांगून खडसे पुढे म्हणाले की, सायबर गुन्हे विभाग, दहशतवाद विरोधी पथक यांना अशा प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर संबंधित संस्थेशी संपर्क साधणे सहज शक्य असल्यामुळे या प्रकरणाची लवकरच चौकशी होवून तथ्य बाहेर येईल, अशी अपेक्षा असल्याचेही खडसे यावेळी म्हणाले.

गेल्या ४-५ दिवसांपासून माझ्यावर केले जाणारे आरोप तथ्यहीन व आधारहीन आहेत, असे स्पष्ट करुन खडसे पुढे म्हणाले की, आरोप करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्याकडे माझ्या संपत्तीबाबत जर ठोस पुरावे आहेत, तर त्यांनी पोलिसाकडे जावून तक्रार करायला पाहिजे होती. सवंग प्रसिध्दीसाठी प्रसिध्दी माध्यमातून हे लोक माझ्यावर आरोप करीत आहेत. या सर्व प्रकरणामागे बोलविता धनी कोण आहे, हे लवकरच समजेल.

एका प्रश्नाला उत्तर देतांना खडसे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल माझ्या मनात कनिष्ठपणाची भावना कधीच नव्हती. माझ्यावरील आरोपा संदर्भात मी व मुख्यमंत्री दोघेही सखोल जावून चौकशी करीत आहोत. आरोप करणाऱ्यांनी आरोप केल्यामुळे पक्षाची, भाजपच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारची आणि व्यक्तीश: माझी निष्कारण बदनामी केली जात आहे. या सर्वामागे असलेले तथ्य बाहेर आले पाहिजे, अशी माझी व मुख्यमंत्री यांची भूमिका आहे.

माझ्यावर आरोप करणाऱ्या अंजली दमानिया यांनी बेकायदेशीररित्या आणि स्वत: शेतकरी नसतांना बनावट कागदपत्रांच्या आधारे शेतकरी असल्याचे दाखवून कोंढाळा धरणाजवळ जमीन खरेदी केली. त्यावेळी स्थानिक जनतेने आक्षेप घेतला होता. मी विरोधी पक्षात असतांना, या प्रकरणाचा मला त्रास होत आहे. त्यातून मार्ग काढावा, यासाठी त्या मला पाच-सहा वेळी भेटल्या. त्यांच्या या बेकायदेशीर व्यवहाराला देखील प्रसिध्दी माध्यमांनी प्रसिध्दी देण्याची गरज असल्याचे खडसे यावेळी म्हणाले.

----**----